# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ ६५८ /२०२१-२२ दिनांक : २० /१२/२०२१

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधित होणारी धोकादायक झाडे मुळासहित काढणे / पुर्नरोपण करणे कामाची सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

20.12.2021

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७, दुरध्वनी क्र. २८१०३४०१

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/६५८ /२०२१-२२ दिनांक : २० /१२/२०२१

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाड काढणे / पुर्न:रोपण करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वृक्षाचे नाव | उंची | संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | अशोक | २५ ते ३० फुट उंच | ०१ | भाईंदर (पु.) गोल्डन नेस्ट फेज-३, ब्लु मुन क्लब येथे ०१ नग अशोक धोकादायकरीत्या शेजारी असलेल्या ऑफिस वर झुकलेले असुन सदर झाडाची मुळे जमिनीवर आलेली असुन सदरचे झाड जोराच्या वाऱ्याने पडुन जिवित व वित्तहानी होण्याची शक्ता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **श्रीम. गायत्री दुबे यांचे दि.२१/०६/२०२१ रोजीचे पत्र.** |
| २. | कडुलिंब | २० ते २२ फुट उंच | ०१ | सदरचे झाड मिरारोड (पु.) जी.सी.सी. क्लब जवळ, मंगल नगर येथे विना एनक्लेव्ह को.ऑ.हौ.सो.लि. यांच्या सोसायटीमध्ये असुन सदरचे झाड सोसायटीच्या कंपाऊंड भिंतवर धोकादायकरीत्या झुकलेले असुन जोराच्या वा-याने झाड पडुन जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरचे झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **विना एनक्लेव्ह को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.२८/०७/२०२१ रोजीचे पत्र.** |
| ३. | नारळ | १० ते १५ फुट उंच | ०१ | सदरचे झाड मिरारोड (पु.) लक्ष्मी पार्क, कनकीया रोड येथे श्री लक्ष्मी आशिष को.ऑ.हौ.सो.लि. यांच्या सोसायटीमध्ये असुन सदरचे झाड सोसायटीच्या पार्कीगमध्ये असुन सदरझाडाच्या झावळ्या व नारळ पार्कीग मध्ये उभ्या असलेल्या वाहनांन व पडुन नुकसान होत असुन सदरचे झाड मुळासहीत काढुन सदर सोसायटीत कंपाऊंड जवळ पुर्न:रोपण करणे आवश्यक आहे. **श्री लक्ष्मी आशिष को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि. १८/१०/२०२१ रोजीचे पत्र.** |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका